# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

## प्रेसनोट

## दि.२२ नोव्हेंबर पासून पीएमपीएमएलचे दोन बस मार्ग सुरु.

- **हडपसर गाडीतळ ते हडपसर रेल्वे स्टेशन व मुंढवा चौक ते केसनंद फाटा (वाघोली) हे दोन मार्ग होणार सुरु.**
- **आठवड्यातून रविवार, मंगळवार व शुक्रवार या दिवशी रेल्वेमधील प्रवाशांच्या सोईसाठी सेवा.**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून शुक्रवार दि. २२/०९/२०२३ पासून हडपसर रेल्वे स्टेशन वरून शहरात येणाऱ्या व शहरातून हडपसर रेल्वे स्टेशनला जाणाऱ्या प्रवासी यांच्यासाठी बस सेवा सुरु करण्यात येणार आहे.

प्रवाशांच्या वाढत्या मागणी नुसार पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून शुक्रवार दि. २२/०९/२०२३ पासून मार्ग क्र. १५६ या मार्गावरील शेड्युलला हडपसर गाडीतळ ते हडपसर रेल्वे स्टेशन (मार्गे – मगरपट्टा, मुंढवागाव, मुंढवा चौक, लोणकर कॉलनी) पर्यंत काही खेपा देण्यात आलेल्या आहेत.

तसेच मुंढवागांव व वाघोली परिसरातील प्रवाशांच्या सोईसाठी मार्ग क्र. १९८ मुंढवा चौक ते केसनंद फाटा (वाघोली) असा मार्ग सुरु करण्यात येत आहे. (मार्गे – माळवाडी मांजरी, आव्हाळवाडी, सातवपार्क, वाघोली बाजार) हे दोन बस मार्ग सुरु करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | मार्ग क्र. | पासुन – पर्यंत | मार्गाचा तपशील | वारंवारिता |
|---|---|---|---|---|
| १. | १५६ | हडपसर गाडीतळ ते हडपसर रेल्वे स्टेशन | मगरपट्टा, मुंढवागाव, मुंढवा चौक, लोणकर कॉलनी. | रेल्वेच्या वेळेनुसार |
| २. | १९८ | मुंढवा चौक ते केसनंद फाटा (वाघोली) | माळवाडी मांजरी, आव्हाळवाडी, सातवपार्क, वाघोली बाजार. | १ तास |

सदर बस मार्ग सुरु होत असल्याने हडपसर रेल्वे स्टेशन वरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना किफायतशीर दरात सुरक्षित सेवा उपलब्ध होणार आहे, तरी जास्तीत-जास्त प्रवासी नागरिकांनी या बस सेवांचा लाभ घ्यावा असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

**sd/-**
चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. २१/०९/२०२३

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.